**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ०६/२०१५-१६/१४२ दिनांक: २७.१०.२०१५

**आदेश केस क्र. ०६/२०१५-२०१६**

१) श्री. गंगाधर सिध्दप्पा बटकडली : अर्जदार.
मु. पो. मेन रोड, आजरा, ता. आजरा,
जिल्हा. कोल्हापूर

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर.

२) कार्यकारी अभियंता, विरुध्द पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, गडहिंग्लज.

**कोरमः-** १. श्री. एन. बी. बारसिंग, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. एन. बी. बारसिंग, सदस्य, सचिव, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

## (१) तक्रारीचे स्वरुप व मागणी .

आज दिनांक १५-१०-२०१५ रोजी ग्राहक तक्रार निवारण मंच कोल्हापूर येथील श्री. गंगाधर सिध्दप्पा बटकडली, मु. पो. मेनरोड, आजरा, ता. आजरा, जिल्हा. कोल्हापूर, स्वतः सुनावणीसाठी प्रत्यक्ष हजर होते. महावितरण तर्फे (वि.प), कार्यकारी अभियंता तथा नोडल अधिकारी श्री. आरळी व श्री. प्रविण शेडगे, सहाय्यक अभियंता, शाखा कार्यालय,आजरा हे उपस्थित होते.

श्री. गंगाधार सिध्दप्प बटकडली, यांनी त्यांच्या मालकीच्या गट नं. १० मध्ये श्री. दिनकर मंगाजी करडे, रा. आजरा यांना दिलेले विद्युत कनेक्शन रद्द करावे अशी मागणी केली आहे. अनुसूची अ मध्ये श्री. बटकडली यांनी सदर मिळकतीचा मी मालक असून माझी संम्मती नसताना न्यायालयीन बाब असताना बेकायदेशीरपणे श्री. करडे यांना विद्युत कनेक्शन दिले आहे असे म्हटले आहे. महावितरण आजरा कार्यालयाने सर्व नियमांचा भंग करुन सदरचे कनेक्शन दिले आहे असेही म्हटले आहे. अंतर्गत कक्षाने श्री. बटकडली यांच्या अर्जावर खालील आदेश पारित केला आहे.

मौजे आजरा येथील सि.स.नं. १० मधील मिळकत क्र. ९ या तक्रार दाराच्या नांवे असलेल्या इमारतीसाठी श्री. दिनकर मं. करडे यांचे नांवे देणेत आलेले वीज कनेक्शन बंद करणेची तक्रार दाराची मागणी अमान्य करणेत येत आहे. श्री. बटकडली यांनी आपली बाजू मांडताना हीच बाब प्रकर्षाने मांडून सोबत जोडलेल्या कागदपत्रासंबंधी व वस्तुस्थितीसंबंधी मंचास सविस्तर माहिती दिली. यावर महावितरणचे उपस्थित अधिकारी यांनी श्री. करडे यांना विद्युत कनेक्शन देतेवेळी कोणत्याही कायदेशीर बाबींचा भंग झालेला नाही असे कथन केले तसेच मंचास सादर केलेल्या १४-१०-२०१५ रोजीच्या पत्रामध्ये विधी सल्लागार यांचे मत नोंदवले आहे. त्यानुसार श्री. दिनकर करडे हे या जागेमध्ये १९९५ पासून आहेत. तेव्हापासून ही जागा त्यांच्या ताब्यात आहे. असे कागदपत्रावरुन दिसून येते असे म्हटले आहे. त्यामुळे विद्युत कायदा २००३ कलम ४३ नुसार सदरचे व्यवसायिक कनेक्शन देणेचा अभिप्राय दिला आहे. तसेच १४-१२-२०१४ रोजी कनेक्शन दिलेचे म्हटले आहे.

विद्युत कनेक्शन हे कोणाच्या मिळकतीचा मालकी पुरावा होवू शकत नाही हे वीज देयकावरच नमुद केले आहे असे ही पत्रात म्हटले आहे. वरील सर्व चर्चा दोन्ही बाजूची कथने याचा विचार करता खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) सदर तक्रारीची दखल घेता येईल का?.
उत्तर : नाही.

२) आदेश
अंतिम आदेशाप्रमाणे.

## निष्कर्ष व कारण मिमांसा.

वरील सर्व चर्चा व हजर केलेली कागदपत्रे पाहता या मंचासमोर सादर केलेल्या तक्रारीमध्ये श्री. बटकडली यांनी श्री. दिनकर करडे यांना दिलेले वीज कनेक्शन रद्द करावे अशी मागणी केलेली आहे. त्यासाठी त्यांनी विविध कागदपत्रे सादर केलेली आहेत. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग( विद्युत पुरवठा संहिता आणी पुरवठ्याच्या इतर अटी). विनिमय २००५. यानुसार या मंचाकडे विद्युत अधिनियम २००३ नुसार जो अर्जदार तक्रार दाखल करु शेकेल त्याची व्याख्या दिली आहे. त्यानुसार व्याख्या कलम नं. २.१ (ब) प्रमाणे ' **अर्जदार** ' म्हणजे अधिनियम आणी त्या खाली करण्यात आलेल्या नियम व विनिमयातील तरतुदींना अनुसरुन विजेच्या पुरवठ्या करीता, करारा अंतर्गत मागणी / मंजुर भारात वाढ किंवा कपात करण्यासाठी, नांवात बदल करण्यासाठी, वीज जोडणी तोडण्यासाठी किंवा पुन्हा जोडण्यासाठी किंवा करार रद्द करण्यासाठी, जसे असेल तसे ज्याने अर्ज केला आहे अशी व्यक्ती.

श्री. बटकडली यांनी त्यांचे म्हणणे मंचासमोर मांडले आहे. परंतु मंचाचे असे मत आहे की, या मंचाकडे अर्जदार या व्याख्येत येणारीच व्यक्ती मंचाकडे अर्ज दाखल करु शकतृे श्री. बटकडली अर्जदार म्हणून या मंचाकडे न्याय मागण्यास सक्षम ठरत नाहीत. सबब, श्री. बटकडली यांच्या तक्रार अर्जाची मंच दखल घेवू शकत नाही.

## आदेश

१) श्री. बटकडली यांची तक्रार फेटाळण्यात येत आहे.

२) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

सही/-

दिनांक : २७-१०-२०१५

(एन. बी.बारसिंग)
सदस्य सचिव

अध्यक्ष पद दिनांक १६-१२-२०१४ पासून रिक्त.

श्री. पी. एस. बुरांडे,
सदस्य,

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.